अपर जिल्हा दंडाधिकारी नाशिक

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

(गृह शाखा)

मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 115

क्र. कक्ष-1/पिओएल-1/680/2026 **दि. 26/10/2026**

वाचले :- 1. मुंबई मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 115 अन्वये अधिसुचना वाचले

2. मा. जिल्हादंडाधिकारी नाशिक यांचेकडील आदेश क्र. कक्ष1/पिओएल-3/451/2013 नाशिक दिनांक 08/05/2023

3. अपर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण यांचेकडील पत्र क्र. जि. वा. शा. व्हि. व्ही. आय. पी. दौरा/वाहतुक मार्ग बदल 275/2026 नाशिक ग्रामीण दिनांक /10/2026 (प्राप्त दि. 23/10/2026)

4. इकडील कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-1/पोल-1/कावि/ 680/2026 दि. 23/10/2026

5. सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर यांचेकडील पत्र जा.क्र. सपोआ / शवाशा / त्र्यंबकेश्वर ध्वजारोहण / 2238 / 2026 दि. 23/10/2026 (प्राप्त दि. 24/10/2026)

अधिसुचना

ज्याअर्थी, अपर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण यांनी वाचले क्र. 3 अन्वये दि. ३१/१०/२०२६ रोजी त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त कुंड व नवीन घाट येथे ध्वजारोहणाचा महत्वपुर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमास मा. महामहिम राष्ट्रपती महोदया व माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य उपस्थित राहणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात अतिमहत्वाच्या व्यक्ती, नागरिक व भाविकांची येजा होण्याची शक्यता आहे.. त्यामुळे त्र्यंबकेश्वर शहरातील वाहतुक सुरळित ठेवणे, वाहतुकीची कोंडी टाळणे व कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरक्षितता राखणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने दि. 30/10/2026 रोजी सकाळी 08.00 वा. पासुन ते दि. 31/10/2026 रोजी रात्री 20.00 वा. पर्यंत त्र्यंबकेश्वर शहराकडे येणारी व त्र्यंबकेश्वर शहरातुन जाणारी वाहतुक ही जव्हार - मोखाडा-अंबोली टी पॉईन्ट -वाघेरे फाटा-कोने-साप्ते-देवरगाव-गिरणारे-गोवर्धन-बारदानफाटा-अमृतगार्डन-नाशिक या मार्गाने वळविणे बाबत आदेश होणेस विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी, सहा. पोलीस आयुक्त, शहर वाहतुक शाखा, नाशिक शहर यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. सपोआ/ शवाशा /त्र्यंबकेश्वर ध्वजारोहण/2238/2026 दि. 23/10/2026 अन्वये प्रस्तावित मार्गाने वाहतुक वळविणेबाबत हरकत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

त्याअर्थी, सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहण कार्यक्रमाच्या दिवशी मोठ्या प्रमाणात अतिमहत्वाच्या व्यक्ती, नागरिक व भाविकांची येजा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वर शहरातील वाहतुक सुरळित ठेवणे, वाहतुकीची कोंडी टाळणे व कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरक्षितता राखणे याकरिता दि. 30/10/2026 रोजी सकाळी 08.00 वा. पासुन ते दि. 31/10/2026 रोजी रात्री 20.00 वा. पर्यंत त्र्यंबकेश्वर शहराकडे येणारी व त्र्यंबकेश्वर शहरातुन जाणारी वाहतुक ही जव्हार - मोखाडा-अंबोली टी पॉईन्ट-वाघेरे फाटा-कोने-साप्ते-देवरगाव-गिरणारे-गोवर्धन-बारदानफाटा-अमृतगार्डन-नाशिक या मार्गाने वळविणे बाबत माझी खात्री झाल्याने, मी अपर जिल्हादंडाधिकारी नाशिक मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 115 अन्वये खालील मार्गावरील वाहतुक ही नमुद केलेले पर्यायी मार्गाने वळविणेबाबत अधिसुचना पारित करीत आहे.

अ. क्र.	पूर्वीचा वाहतुकीचा मार्ग	तात्पुरता पर्यायी मार्ग
1	नाशिक - पिंपळगाव बहुला - संदिप फाऊंडेशन - खंबाळे - पेगलवाडी फाटा - त्र्यंबकेश्वर	अमृतचौक - बारदान फाटा - गोवर्धन - गिरणारे - धोंडेगाव - देवरगाव - वाघेराफाटा - अंबोलीफाटा - सापगाव - त्र्यंबकेश्वर

2	जव्हार - मोखाडा - अंबोली - त्र्यंबकेश्वर - पेगलवाडी - खंबाळे - संदिप फाऊंडेशन — नाशिक	जव्हार - मोखाडा - अंबोली टी पॉईन्ट - वाघेरे फाटा - कोने - साप्ते - देवरगाव - गिरणारे - गोवर्धन — नाशिक
3	मुंबई बाजुकडून येणारी वाहतुक - वैतरणाफाटा मार्गे - पहिने — त्र्यंबकेश्वर	वैतरणाफाटा - नाशिक - अमृतगार्डन - बारदानफाटा - गोवर्धन - गिरणारे - धोंडेगाव - त्र्यंबकेश्वर
4	पहिने - पेगलवाडी — नाशिक	पहिने - आहुर्ली - सांजेगाव - वाडीवऱ्हे — नाशिक
5	पहिने - पेगलवाडी — त्र्यंबकेश्वर	पहिने - भिलमाळ - निरगुड पाडा - जांभुळपाडा - सापगाव - त्र्यंबकेश्वर

सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 116 अन्वये वाहतुक दिशादर्शक व वाहतुक चिन्हे लावण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

उक्त निर्बंध हे परिस्थिती नुसार शिथिल करण्याचा व अचानक उद्‌भवणाऱ्या परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द भारतीय न्याय संहिता, 2023 व मोटार वाहन अधिनियम, 1988 चे प्रचलित तरतूदींप्रमाणे कायदेशिर कारवाईस पात्र राहतील. सदर अधिसुचना आज दि. 26/10/2026 रोजी माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित केली आहे.

(रोहितकुमार राजपूत)
अपर जिल्हादंडाधिकारी नाशिक

ठिकाण :- नाशिक
दिनांक :- 26/10/2026

अपर जिल्हा दंडाधिकारी नाशिक

प्रति,

1) मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
2) मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडेस माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
3) मा. पोलीस अधिक्षक नाशिक (ग्रामीण) यांचेकडेस माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
4) उपविभागीय दंडाधिकारी नाशिक / इगतपुरी-त्र्यंबक / दिंडोरी / कळवण / बागलाण / चांदवड / मालेगाव /येवला / निफाड यांचेकडेस योग्य त्याकार्यवाहीसाठी रवाना.
5) कार्यकारी दंडाधिकारी नाशिक / इगतपुरी / त्र्यंबकेश्वर / दिंडोरी / पेठ / कळवण / सुरगाणा / बागलाण / चांदवड / देवळा / मालेगांव / येवला / नांदगांव / निफाड / सिन्नर यांचे कडेस योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
6) कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नाशिक / सा. बां. म. न. पा. नाशिक

2/- प्रस्तावित मार्गावरील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक त्या दुरुस्त्या तात्काळ करण्यात याव्यात. जेणेकरुन अपघात अथवा कोणताही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

7) जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांचेकडेस वृत्तपत्रे/ वृत्तवाहिनी/ समाजमाध्यमे/ रेडीओ/ इ. यांवर व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देणेकामी रवाना.